पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस / ४ / कावि / ६४९ / २०१२
दिनांक - २६ / ०४ / २०१२

प्रति,

मा...........................................
सदस्य, शहर सुधारणा समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची सभा दिनांक ०२/०५/२०१२ रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०२/०५/२०१२ रोजी दुपारी १२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत :- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

\\Nagersachiv4\nnn\Nagersachiv1/shsu-11-12\agenda3doc.

*पिंपरी चिंचवड महानगरपालिका*
*मा. शहर सुधारणा समिती*
*कार्यपत्रिका क्रमांक - २*

*दिनांक :- ०२ / ०५ / २०१२* *वेळ :- दुपारी १२.०० वाजता*

*पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक - ०२ / ०५ / २०१२ रोजी दुपारी १२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.*

*अ) दिनांक ०९/११/२०११, २३/११/२०११, ०५/१२/२०११, १४/१२/२०११, २८/१२/२०११, २९/१२/२०११, ०२/०१/२०१२, ०४/०१/२०१२,२२/०२/२०१२ व ०७/०३/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ६) सभावृत्तांत कायम करणे.*
*ब) दिनांक ११/०१/२०१२, २२/०२/२०१२ व ०७/०३/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ९) सभावृत्तांत कायम करणे.*
*अ) दिनांक १६/०४/२०१२ रोजी झालेल्या पहिल्या सभेचा (विशेष सभेचा) (कार्यपत्रिका क्रमांक १) सभावृत्तांत कायम करणे.*

*विषय क्रमांक १ :- मा. क प्रभाग समिती सभा दि. ०७/०९/२०११ ठराव क्र.४२ नुसार, प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील हरित विभागातील क्षेत्र लगतच्या निवासी विभागासह यापुर्वी म.न.पा.चे नियोजन नियंत्रण कक्षेत समाविष्ट झाले आहे. तथापि गाव मौजे - बो-हाडेवाडी येथील नविन गट नंबर ७५ व लगतचे क्षेत्र प्राधिकरणाने संपादन केलेले नाही. मात्र सदर क्षेत्र नजरचुकीने प्राधिकरणाचे नियंत्रणाखाली ठेवले गेले आहे. या ठिकाणी विकास परवानगी घेणेसाठी जमीनधारक प्राधिकरणा कडे गेल्यास क्षेत्र म.न.पा.चे नियोजन नियंत्रणाखाली असल्याचे प्राधिकरणाकडून सांगण्यात येते व यापूर्वी म.न.पा. कडे आलेले क्षेत्रात या जागेचा समावेश नसल्याने म.न.पा. मार्फत विकास परवानगी देण्यात येत नाही. सबब असे सर्व क्षेत्राचा शोध घेऊन ते म.न.पा.चे नियोजन नियंत्रणात घेऊन म.प्रा. व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करुन सदर क्षेत्राच्या झोन निश्चितीची कार्यवाही करावी. उक्त अधिनियमाचे कलम ३७ अन्वये करावयाचे कार्यवाहीस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.*

( दिनांक ०२/०५/२०१२ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे )

विषय क्रमांक २ :- मा. क प्रभाग समिती सभा दि.०७/०९/२०११ ठराव क्र. ४७ नुसार, सिटी सर्व्हे नं.५०३५ जागामालक गुडसे सिटी सर्व्हे नं.५०३६ रियाज जहागीर पिरजादे सिटी सर्व्हे नं.५०३७ रियाज जहागीर पिरजादे, सिटी सर्व्हे नं. ५०३३ मैनुद्दीन पिरजादे या सर्व जागामालकांकडून त्यांना समजून सांगून त्यांच्याकडे सात मीटर रस्त्याकरीता विनंती करुन खडीमुरुमाचा रस्ता केलेला आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम २०५ प्रमाणे झालेल्या रस्त्याला मान्यता देऊन मनपाच्या नियमाप्रमाणेवरील सर्व जागामालकांना टी.डी.आर.चा मोबदला मिळावा तसेच सदरचा रस्ता डी.पी.प्लॅनमध्ये नागरिकाच्या घरावरुन जात असून त्या नागरिकांचे घरे वाचवण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ कलम ३७ आधार घेऊन सदरचा रस्ता बदल करणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
( दिनांक ०२/०५/२०१२ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे )

विषय क्रमांक ३ :- मा. क प्रभाग समिती सभा दि.०५/१०/२०११ ठराव क्र.६३ नुसार, वॉर्ड क्र.२३ गुळवेवस्ती, शांतीनगर या भागात सद्यस्थितीत असलेल्या नाल्याचे समांतर असलेला विकास आराखडयातील १२.०० मी. रुंदीचा रस्ता तसेच सदर रस्त्यापासून शांतीनगर झोपडपट्टीमधुन एम.आय.डी.सी. "एस" ब्लॉक ला मिळणारा १२.०० मी. रुंदीचा रस्ता असे दोन्ही ही रस्ते लोकवस्तीमधुन व झोपडपट्टीमधुन जात आहे. या भागात सद्यस्थितीत असलेले रस्ते लक्षात घेऊन तसेच लोकवस्ती व झोपडपट्टी लक्षात घेऊन सदर रस्ते विकसीत करण्याची आवश्यकता वाटत नाही. तरी सदर दोन्ही १२.०० मी. रुंदीचे रस्ते विकास आराखडयामधून रद्द करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
( दिनांक ०२/०५/२०१२ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे )

विषय क्रमांक ४ :- मा. रामआधार धारिया, मा. गोपाळ कुटे यांचा प्रस्ताव -
पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमधील रेड लाईन व ब्लू लाईनमध्ये होत असलेल्या बांधकामांबाबत धोरण ठरविणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

*( दिनांक ०२/०५/२०१२ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे )*

*विषय क्रमांक ५ :- १) २.० हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्राच्या रेखांकनात ५ टक्के सुविधा क्षेत्र ठेवणे अनिवार्य करुन त्यामध्ये त्यापैकी १० टक्के क्षेत्र परवडण्याजोगी रोजगार सुविधासाठी (Affordable Work Space ) राखून ठेवण्याबाबत*

*२) मनपाच्या शॉपिंग सेंटर / मार्केट इत्यादींचा विकास / पुनर्विकास करताना त्यामधील १० टक्के क्षेत्र हे Affordable Work Space साठी राखून ठेवण्याबाबत. वरील दोन तरतूदी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१क क) अन्वये शासनाने जाहिर केलेल्या नोटीसीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या हरकती / सुचना पाठविण्यात आल्या असून त्यावर पिं.चिं.मनपाच्या सर्वसाधारण सभेचे अभिप्राय मागविले असल्याने सदरचे हरकती / सुचना तपासून त्यावर अभिप्राय प्रस्तावा सोबतच्या प्रपत्रानुसार ठेवणेत आला असल्याने त्याकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.*

*( दिनांक ०२/०५/२०१२ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे )*

*विषय क्रमांक ६ :- शासनाने सर्व महानगरपालिका क्षेत्रातील विद्यमान पेट्रोल पंप / डिझेल / सी.एन.जी. इ. पंप बंद करुन तेथे विद्यमान वापराव्यतिरिक्त इतर वापर करण्याबाबत निर्बंध घालण्याचा शासनाने म.प्रा.व न.र.अधि १९६६ च्या कलम ३७(१) सह १५४ अन्वये सर्व महानगरपालिकांना क्र.टिपीबी- ४६०८ /२११/ प्र.क्र.८७ /२००९/नवि-११ दि.०३/१२/२००९ नुसार निदेश दिलेले आहेत. सदर निर्णयाच्या अनुषंगाने मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१क क) अन्वये शासनाने नोटीस जाहीर केली आहे व त्यानुसार उपसंचालक नगररचना, पुणे विभाग पुणे यांना नियुक्त अधिकारी घोषित केलेले आहे. सदर नोटीसीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या हरकती / सुचना पाठविण्यात आल्या असून त्यावर पिं.चिं.मनपाच्या सर्वसाधारण सभेचे अभिप्राय मागविले असल्याने सदरचे हरकती / सुचना तपासून त्यावर अभिप्राय प्रस्तावा सोबतच्या प्रपत्रात जोडला असल्याने सदर प्रकरणी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.*

*विषय क्रमांक ७ :- मा. ड प्रभाग समिती सभा दिनांक ०२/१२/२०११ ठराव क्र.५० नुसार, मौजे सांगवी येथील सर्व्हे नंबर ९ व ८४ च्या गावठाणालगतच्या जागेत पुर्वीपासून खाजगी मालकाची अनेक घरे आहेत. मंजूर विकास योजनेनुसार सदरची घरे १८ मी. व १२ मी. रस्त्यावर बाधीत होत आहेत. मंजूर विकास योजनेप्रमाणे असणारा चौक व १८ मी. रस्ता नदीकडेच्या व दक्षिणेकडील सर्व्हे नंबर ९ मधील रस्ता विकसित झालेला दिसत आहे. त्यानुसार असणारी विद्यमान घरे ही बाधीत होतांना दिसत नाही. म्हणून प्रत्यक्ष जागेवरील रस्त्याची व चौकांची आखणीप्रमाणे मंजूर विकास योजनेची रस्त्याची आखणी दुरुस्त होणे आवश्यक आहे. यासाठी म.प्रा. व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये उपरोक्त प्रमाणे फेरबदलाचा प्रस्ताव शासनाचे मंजूरीकामी पाठविण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.*

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

*पिंपरी चिंचवड महानगरपालिका*
*पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय*
*क्रमांक :- नस / ४ / कावि / ६४९ / २०१२*
*दिनांक :- २६ / ०४ / २०१२*

*टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.*

\\Nagersachiv4\nnn\Nagersachiv1/shsu-11-12\agenda3doc.